# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक ११.१०.२०२५

## नागपुर ग्रामीण जिल्हयांअंतर्गत ड्रोन कॅमेऱ्या द्वारे पेट्रोलींग करून जेसीबीच्या साहायाने अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध करण्यात आली कठोर कारवाई

मा. श्री. हर्ष ए. पोद्‌दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर, ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात **अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.**

पोलीस स्टेशन जलालखेडा :— दिनांक ०२/१०/२०२५ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील उमठा ( पारधी बेडा), बानोरचंद्र (सिखबेडा), हिवरमठआणि साखरखेडा येथे **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन जेसीबी चा वापर करून जमीनीत गाडुन ठेवलेले मोहाफुल सडवा रसायन काढुन अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई केली**. नमुद कारवाईत आरोपी नामे १) रवी दादा पवार, वय ४२ वर्ष रा. उमठा,२) बलवानसिंग लडडुसिंग बावरी,वय ३३ वर्ष, रा. बानोरचंद्र (सिख बेडा) ,३) सोन्याजी शेरू पवार, वय २२ वर्ष, रा. उमठा ४) आशिष उदयभान दूधकवडे, वय २९ वर्ष, रा. घोगरा, ५) सलीम सुरेंद्र पवार, वय ३५ वर्ष, रा. उमठा,६) सद्या पुरुषोत्तम भोसले, वय ४० वर्ष, रा. उमठा आणि १० महीला आरोपी यांच्या ताब्यातुन पंचासमक्ष१) १०६० लिटर मोहाफुल दारू किंमती १,०६,०००/—रूपये, २) ६८०० लिटर मोहाफुल सडवा रसायन किंमती २,०३,०००/—रूपये आणि व ३) देशी दारू संत्र १८० मिली २७ निपा किंमती २१६० /— रूपये आणि इतर साहीत्य असा एकुण ३,११,१६०/— रूपयांचा मुद्‌देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्‌देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक ०४/१०/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी दंगा नियंत्रण पथकासह संयुक्तरित्या कारवाई करत गौंडखैरी बरड येथे **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन आरोपीतांच्या घरामध्ये सुरू असलेल्या मोहफूल गावठी दारू भट्टयांवर कारवाई केली.**

**.आरोपी नामे १) आणेकर श्याम पवार, वय २८ वर्षे, आणि ११ महीला आरोपी सर्व राहणार गोंडखैरी बरड, ता. कळमेश्वर अशा आरोपीतांवर कारवाई करत ६२० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती ६२,००० /– रूपये, ७,९०० लिटर मोहाफुल सडवा किंमती २,८४,५०० /– रूपये, लोखंडी ड्रम ,प्लॅस्टिक ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण ३,८९,१०० /– रूपये असा मुद्देमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक ०४/१०/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात कळमेश्वर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी दंगा नियंत्रण पथकासह संयुक्तरित्या कारवाई करत गौंडखैरी बरड येथे **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन आरोपीतांच्या घरामध्ये सुरू असलेल्या मोहफूल गावठी दारू भट्टयांवर कारवाई केली.**

**.आरोपी नामे १) आणेकर श्याम पवार, वय २८ वर्षे, आणि ११ महीला आरोपी सर्व राहणार गोंडखैरी बरड, ता. कळमेश्वर अशा आरोपीतांवर कारवाई करत ६२० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती ६२,००० /– रूपये, ७,९०० लिटर मोहाफुल सडवा किंमती २,८४,५०० /– रूपये, लोखंडी ड्रम ,प्लॅस्टिक ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण ३,८९,१०० /– रूपये असा मुद्देमाल जप्त करून नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.** तसेच दिनांक ०५/१०/२०२५ रोजी **२ पुरूष आणि ३ महीला आरोपी सर्व राहणार गोंडखैरी बरड, ता. कळमेश्वर अशा आरोपीतांवर कारवाई करत**

**२०० लिटर मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू किंमती**२०,००० **/— रूपये,** ३,४०० **लिटर मोहाफुल सडवा किंमती१,१९,००० /— रूपये, लोखंडी ड्रम ,प्लॅस्टिक ड्रम आणि इतर साहित्य असा एकुण १,५०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०५गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

पोलीस स्टेशन केळवद :— दिनांक ०६/१०/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या नेतृत्वात केळवद पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री आशिषसिंह ठाकुर आणि केळवद पोलीस यांच्या पथकाने केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील पारधीबेडा तिडंगी येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढण्यासाठी रनिंग भट्टयांकरीता जमीनीत गाडुन ठेवलेले ड्रम तसेच गावठी हातीभट्टीची दारू काढण्याकरीता लागणारे साहीत्य जेसीबी च्या साहायाने बाहेर काढुन नष्ट करण्यात आले.

**पोलीस स्टेशन उमरेड** :—दिनांक १०/१०/२०२५ रोजी उमरेड पोलीस स्टेशन हद्दीतील दहेगाव ( पारधी बेडा) येथे मोहाफुल श्रीमती वृष्टी जैन, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्री धनाजी जळक ,प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड यांनी उमरेड पोलीस स्टेशन चे अधिकारी आणि अंमलदार यांचे पथकासह जावुन **ड्रोन कॅमेऱ्याद्वारे पेट्रोलींग करून घटनास्थळी जावुन जेसीबी चा वापर करून मोहाफुल सडवा रसायनाचे ड्रम काढुन कारवाई केली**. नमुद कारवाईत २ महीला आरोपी यांच्या ताब्यातुन पंचासमक्ष मोहाफुल रसायन सडव्याने भरलेले एकूण आठ ड्रम किमती १२,००० हजार, वरील सर्व ड्रम मधील एकूण १६०० किलो मोहा फुल रसायन सडवा किमती ५६,००० /— रुपये, ११५ लिटर मोहाफुल दारू किमती ५,७५० /— रुपये, भट्टीवर वापरण्यात आलेले इतर साहित्य २२६० /— रुपये, असा एकूण **७६,०१० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला**. दोन महीला आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

दिनांक ०७/१०/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पारधीबेडा तिडंगी येथे जावुन घटनास्थळाची पाहणी करून पोलीसांनी केलेल्या कारवाईचा आढावा घेतला. तसेच तेथील नागरिकांशी संवाद साधुन त्यांना विचारपुस केली असता गावातील दारू समुळ नष्ट केल्यामुळे तेथील नागरिकांनी मा. पोलीस अधिक्षकांचे आभार मानले.











**| व्यवस्था |** पुलिस की सटीक निगरानी से बढ़ी कार्रवाई की रफ्तार

# ड्रोन पेट्रोलिंग अपराधियों के लिए मुसीबत

■ नागपुर, कार्यालय प्रतिनिधि. आधुनिक तकनीक का उपयोग अब अपराध नियंत्रण में पुलिस के लिए एक प्रभावी हथियार बनता जा रहा है. नागपुर ग्रामीण पुलिस ने हाल ही में अपनाई गई ड्रोन पेट्रोलिंग प्रणाली के माध्यम से कई अवैध गतिविधियों पर नकेल कस दी है. यह नई व्यवस्था अपराधियों के लिए सिरदर्द बनती जा रही है. जानकारी के अनुसार, नागपुर ग्रामीण क्षेत्र के विभिन्न थानों के अंतर्गत पुलिस ने पिछले कुछ दिनों में ड्रोन की मदद से कई अवैध शराब निर्माण, बिक्री, जुआ और चोरी जैसी गतिविधियों का भंडाफोड़ किया है. 4 अक्टूबर को हुई एक बड़ी कार्रवाई में पुलिस ने ड्रोन सर्वे के जरिए ऐसी कई जगहों की पहचान की जहां खुले में देसी और महुआ शराब का निर्माण किया जा रहा था. मौके पर छापा मारते हुए पुलिस ने करीब लाखों रुपये का अवैध माल जब्त किया और अनके आरोपियों को गिरफ्तार भी किया. ड्रोन पेट्रोलिंग के जरिए दूरदराज और घने जंगल वाले इलाकों में भी निगरानी रखना आसान हो गया है. पहले जहां पुलिस को सूचना और मुखबिरों पर निर्भर रहना पड़ता था वहीं अब ड्रोन कैमरे कुछ ही मिनटों में स्थिति स्पष्ट कर देते हैं. यह तकनीक विशेष रूप से उन गांवों में कारगर साबित हो रही है जहां पारधी बेड़ों और अन्य क्षेत्रों में अवैध शराब का धंधा लंबे समय से चल रहा था. अब ड्रोन की मदद से पुलिस सीधे इन ठिकानों की पहचान कर सटीक समय पर छापा मार रही है. ड्रोन से प्राप्त फुटेज के आधार पर पुलिस ने हाल ही में हिंगना, उमरेड, काटोल, कलमेश्वर, सावनेर समेत अन्य थानों के अंतर्गत कई जगहों पर कार्रवाई की है. ग्रामीण पुलिस ने बताया कि ड्रोन पेट्रोलिंग के चलते अब अपराधी भी नये ठिकाने बदलने में असमर्थ हो रहे हैं क्योंकि आकाश से हर गतिविधि पर नजर रखी जा रही है. ग्रामीण नागरिकों ने भी इस कदम की सराहना की है. उनका कहना है कि ड्रोन पेट्रोलिंग से अब अपराधियों के हौसले पस्त हो गए हैं और ग्रामीण इलाकों में सुरक्षा और शांति का माहौल बढ़ा है.



## नियमित जारी रहेगी ड्रोन पेट्रोलिंग



भविष्य में ड्रोन पेट्रोलिंग को नियमित निगरानी व्यवस्था का हिस्सा बनाया जाएगा, ताकि अंधेरे में हो रहीं अवैध गतिविधियों खासतौर पर रात के समय संचालित होने वाली शराब भट्टियों पर नजर रखी जा सके. नागपुर ग्रामीण पुलिस की ड्रोन पेट्रोलिंग व्यवस्था ने अपराध नियंत्रण में नई दिशा दी है. आधुनिक तकनीक से अपराधियों पर सटीक नजर रखी जा रही है जिससे पुलिस की कार्रवाई अधिक प्रभावी और तेज हुई है.

-हर्ष ए.पोद्दार, पुलिस अधीक्षक, नागपुर ग्रामीण पुलिस.

तरुण भारत
Nagpur Pages | 2025-10-08 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# तिडंगीतील दारू अड्ड्याचा पर्दाफाश

## जेसीबीच्या मदतीने साहित्य केले नष्ट

◆ **केळवद, ७ ऑक्टोबर**

ग्रामीण भागात रोजगार मोठ्या प्रमाणात मिळू शकतो. पण काही लोकांचा गैरसमज आणि कमी श्रमात अधिक पैसा मिळविण्याची हौस यातून अवैध दारू काढली जाते. पण या अवैध दारूच्या अड्ड्यांमुळे ग्रामीण भागातील जनता व्यसनाधिन बनत आहे. या स्थितीत आपल्या गावाच्या हितासाठी काही मंडळी पुढे आले व त्यांनी पोलिसांना तिडंगी येथील अड्ड्याचा सफाया करावा अशी विनंती केली. मग काय पोलिसांनी जोरदार धडाका दाखवित केळवद पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या तिडंगी पारधीबेडा भागातील सुरू असलेल्या दारू अड्ड्याचा सफाया केला.

केळवद भागात तिडंगी येथे मोठ्या प्रमाणात दारू तयार केली जायची. पण जेव्हा केव्हा पोलिस यंत्रणा धाड टाकायला जायची तेव्हा तिथे दारूचे ड्रम दिसत नव्हते. नेमके हे ड्रम गेले कुठे, असाही प्रश्न उपस्थित होत होता.

अशावेळी पोलिसांनी संपूर्ण परिसराचा सुक्ष्म अभ्यास केला. तेव्हा असे लक्षात आले की, आरोपी सर्व साहित्य जमिनीत गाडून ठेवायचे. मग काय पोलिसांनी जमिनीत गाडलेले साहित्य खोदून काढण्यासाठी जेसीबीच्या मदतीने थेट धाड टाकली.

या धाडीत पोलिसांना मोठ्या प्रमाणात अवैध दारूचा साठा सापडला. तो साठा जेसीबीच्या मदतीने नष्ट करण्यात आला. ही कारवाई करीत असताना इतर साहित्याचे नुकसान टाळण्याची मानवीय भूमिका पोलिसांनी पार पाडली, हे विशेष.

ही कामगिरी पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, सहायक पोलिस अधीक्षक सागर खर्डे, सहायक पोलिस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर आणि केळवद पोलिसांनी यशस्वी केली.

◀(तभा वृत्तसेवा)



### गावकरी पोलिसांना म्हणाले, आम्ही आपले आभारी आहोत

केळवद पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पारधीबेडा तिडंगी येथे सतत अवैध दारूचा महापूर वाहायचा. सहजतेने दारू मिळत असल्याने युवा पिढी व्यसनाधिन झाली होती. यामुळे गावकरी चिंतेत होते. त्यामुळे त्यांनी पोलिसांना कारवाईसाठी विनंती केली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली. यावेळी सर्व गावकऱ्यांनी पोलिसांचे आभार मानले. आपण अशीच भूमिका नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक गावासाठी घ्यावी, तेव्हाच व्यसनाकडे जाणाऱ्या मुलांना पायबंद बसेल. शेवटी युवा पिढी वाचवायची असेल तर कुठेतरी कणखर भूमिका घेणे अनिवार्य असल्याचेही गावकऱ्यांनी स्पष्ट केले. ■

Powered by Bharati Web

तरुण भारत
Nagpur Pages | 2025-10-10 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# ड्रोनच्या मदतीने दारू अड्डा उद्ध्वस्त

## पोलिसांच्या धडक कारवाईने गुन्हेगार दहशतीत

◆ **जलालखेडा, ९ ऑक्टोबर**

ग्रामीण भागातील वाढलेले अवैध धंदे कुठल्याही स्थितीत बंद करण्यासाठी पोलिसांनी विशेष अभियान सुरू केले आहे. त्याअनुषंगाने ड्रोनची मदत घेत ग्रामीण पोलिसांनी एका गावठी दारू अड्ड्यालाच उद्ध्वस्त करीत शेकडो कुटुंबीयांचे संरक्षण केले.

ही कारवाई जलालखेडा पोलिस स्टेशन अंतर्गत करण्यात आली. पोलिसांची अवैध धंद्यांवर कार्यवाही सत्र सुरूच आहे. ड्रोनच्या मदतीने विशेष मोहीम राबवून काटोल उपविभागातील जलालखेडा भागात येणाऱ्या उमठा (पारधी बेडा) येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यां ४ पुरुष व २ महिला विरोधात कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी पोलिसांनी ७० लिटर मोहफुल गावठी दारू किंमती ७ हजार, ३६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा किंमत १ लक्ष २६ हजार रुपये, १५ देशी दारूच्या बॉटल किंमत १ हजार ५० रुपये, दारू गाळण्याचे साहित्य किंमत २७ हजार रूपये, एक मोबाईल किंमत २० हजार रूपये असा एकूण दोन लाखांचा माल जप्त केला.

याप्रकरणी ६ आरोपींवर भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

यातील ३ आरोपीना अटक करण्यात आलेली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, उपविभागीय पोलिस अधिकारी पराग पोटे यांचे मार्गदर्शनात व जलालखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार तुषार चव्हाण यांचे नेतृत्वात फौजदार विजय माळी, नीलेश खरडे, आशिष हिरूळकर, सुलोचना दुपारे, फिरोज शेख, शंकर आचट, किशोर कांडेलकर, रवींद्र मोहोड, ललिता चौधरी यांनी यशस्वी केली.

◀(तभा वृत्तसेवा)

Powered by Bharati Web